



REGISTERED No. B. 3434

# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संस्थापक—प्रो. वा. गो. काळे ★ संपादक—श्री. वा. काळे

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख १७ एप्रिल १९४६ अंक १६



श्री —— श्री —— श्री —— श्री —— श्री

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

कंपनीनें चार लक्ष रुपयांचे ऑर्डिनरी शेअर दर शेअरला रु. ५ प्रिमिअम असे विक्रीस काढले आहेत.

युद्धोत्तर कालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री —— श्री —— श्री —— श्री —— श्री

# विविध माहिती

**उद्बोधक उद्गार**—" ब्रिटिश निर्गतीमधील वाढ उत्तेजनकारक आहे, परंतु स्पर्धेस तोंड देऊन ही निर्गत चालू ठेवतां आली पाहिजे. आजच्या परिस्थितींत आपण कांहींहि विकूं शकतों. "
—सरजॉन अँडरसन ह्यांचें कॉमन्स सभेंत भाषण.

* * *

**कै. शं. गो. देवधर : कोरेगांव येथील सभा**—मुं. प्रां. सहकारी बँकेचे मॅनेजर श्री. देवधर ह्यांच्या निधनाबद्दल बँकेच्या कोरेगांव शाखा कमिटीच्या सभेंत ता. ३१-३-४६ रोजीं दुःख व्यक्त करण्यांत येऊन दुखवट्याचा ठराव करण्यांत आला.

**२० कोटींचें नवें कर्ज**—हिंदुस्थान सरकारनें १९६० सालीं परतफेडीचे २½% चे आणखी २० कोटि रुपयांचे कर्जरोखे विक्रीस काढले आहेत.

**हिंदी कपाशीचा गिरण्यांत उठाव**—हिंदी गिरण्यांत डिसेंबर, १९४५ मध्यें एकूण ३,६३,१४३ गाठी हिंदी कपास खपली.

**फ्रान्समधील विमाव्यवसायाचें राष्ट्रीयकरण**—फ्रेंच सरकारनें फ्रान्समधील विमा व्यवसायाचें राष्ट्रीयकरण करण्याचें ठरविलें आहे. विमा कंपन्यांच्या भागीदारांस ३% व्याजाचे सरकारी रोखे देण्यांत येतील. विमेदारांचे हक्क मूळ कराराप्रमाणें कायम राहतील. फ्रेंच सरकारनें कोळशाच्या खाणी व डिपॉझिट बँका ह्यांचें राष्ट्रीयकरण अगोदरच केलेलें आहे. गॅस व वीज ह्यांच्या धंद्याचें राष्ट्रीयकरण आतां करण्यांत येत आहे.

**लिमिटेड कंपन्यांचे कागदपत्र**—शत्रूच्या कारवाईमुळें कंपन्यांच्या महत्त्वाच्या कागदपत्रांचा नाश होऊं नये ह्यासाठी असे कागदपत्र त्यांच्या नोंदलेल्या कचेऱ्यांतून काढून दुसरीकडे सुरक्षित ठेवण्याची परवानगी भारत संरक्षण कायद्यानें दिली होती. ह्या सवलतीची आतां आवश्यकता उरली नाहीं; तेव्हां ९ जून १९४६ पूर्वीं असे कागदपत्र पूर्वींप्रमाणें कंपन्यांच्या नोंदलेल्या कचेऱ्यांत परत आले पाहिजेत. कारण, ही सवलत देणारा नियम त्या तारखेस रद्द होणार आहे, असें जाहीर झालें आहे.

**सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्स**—हिंदुस्थान सरकारचे सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्स, श्री. वैद्यनाथन्, ह्यांनीं आपल्या जागेचा राजीनामा दिला आहे. आपल्या पूर्वींच्या कंपनींत म्हणजे ओरिएंटल विमा कंपनींत ते मॅनेजर झाले आहेत. श्री. कृष्णमूर्ति, एफ्. आय्. ए. हे सुपरिंटेंडेंटचे दुय्यम म्हणून काम करीत होते ते आतां हंगामी सुपरिंटेंडेंट झाले आहेत.

**राष्ट्रांतील सर्व लोकांस मोफत औषधोपचार**—ग्रेट ब्रिटनच्या आरोग्य मंत्र्यांनीं पार्लमेंटपुढें राष्ट्राच्या आरोग्यासंबंधीं बिल आणलें आहे, तें पास झाल्यास १९४८ पासून त्या राष्ट्रांतील यच्चयावत लोकांना मोफत औषधोपचार मिळेल. त्या बिलानुरूप राष्ट्रांतील सर्व दवाखाने राष्ट्राच्या मालकीचे होतील. योजनेंतील सर्व डॉक्टरांना सरकारी पगार मिळेल व त्यांना रोग्यांना मोफत औषधोपचार करावा लागेल. या योजनेचा सर्व राष्ट्रावर ९½ कोटि पौंड दरसाल पडेल असा अंदाज आहे.


























छत्रे यांचा
-कोल्हापुरी- संगीत चिवडा
वापरून पाहुण्यांस खूष ठेवा.
किंमत १ रत्तलाला २ रुपये.
मालकः—एन. व्ही. वेलणकर, गिरगांव रोड
फो. नं. ३३८४९ ] मुंबई ४.

पुणें चीफ एजंटसः—
मेसर्स श्री दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें

# पेटंट वापरल्याबद्दल द्यावयाची रकम

## हिंदी कारखानदारांचे करार

हिंदुस्थानांतील कित्येक भांडवलवाले लोक ब्रिटिश कंपन्यांच्या सहायाने येथें कारखाने उभारून त्यांत त्या कंपन्यांच्या विशिष्ट मालाचें उत्पादन करण्याच्या विचारांत आहेत. कित्येकांनी त्या संबंधांत करार-मदारहि केल्याचें प्रसिद्ध झालें आहे. पंप, सायकली, मोटारी, रसायनें, औषधें, मशिनरी, इत्यादि मालाची विक्री त्याच्या दर्जावर व मान्यतेवर अवलंबून असते आणि मान्यता पावलेल्या नांवानेच त्यांचा मोठ्या प्रमाणावर खप होऊं शकतो. अशा मालाच्या उत्पादनांतील कांहीं विशिष्ट पद्धतींचें पेटंट घेऊन ठेवलेलें असतें आणि तें दुसऱ्यास मोबदला घेऊन वापरूं देण्यांत पेटंटवाल्याचा फायदाच असतो. हिंदी कारखानदारांस ते वापरणार असणाऱ्या पेटंटबद्दल ब्रिटिश कंपन्यांना सहाजीकच पैसे द्यावे लागतील. पैशाची ही रकम कशी ठरवावयाची, हा महत्त्वाचा प्रश्न येथें उपस्थित होतो. एकाच रकमेनें पेटंट विकत घेतां येतें. पेटंट विकणाराचे दृष्टीनें त्यांत सोय असते, कारण त्याला पेटंटच्या आयुष्यांत मिळणाऱ्या नफ्याची एकत्रित रकम एकदमच त्याचे हातीं येते. पेटंट विकत घेणारास मात्र त्यांत मोठा धोका असतो. मालाच्या विक्रीबाबत त्यास खात्री असेल, तर गोष्ट वेगळी. पेटंटचा उपयोग करून उत्पादन केलेल्या मालाच्या विक्रीवर ठराविक टक्के रकम देण्याचेंहि ठरवितां येतें. पेटंटचा उपयोगच केला नाहीं किंवा त्यांत दिरंगाई झाली, तर पेटंट विकणाराचें त्यांत नुकसान असतें. पेटंट विकत घेणारास पेटंटची आगाऊ रकम भरावी लागत नाहीं, हा त्याचा फायदा आहे. किती नगांचें उत्पादन होईल, ह्यावर ही पेटंटची किंमत ठरविली जाणें शक्य असतें. पेटंट विकणाराचें त्यांत वरील प्रमाणेंच नुकसान असतें. बाजारभाव पडला तर पेटंटसाठी निश्चित रकम द्यावीच लागते, ही तें विकत घेणाराचे दृष्टीनें गैरसोय आहे. निवळ नफ्यावर ठराविक रॉयल्टी घेण्याचीहि पद्धत आहे. उत्पादनाच्या खर्चावर पेटंटच्या मालकाची देखरेख असूं शकत नाहीं, ह्यामुळें रॉयल्टी बुडविली जाण्याचा त्यांत धोका रहातो. धंद्यास वाईट दिवस आले, तर आपोआपच रॉयल्टीची रकम कमी होते, हा पेटंट विकत घेणाराचे दृष्टीनें फायदा असतो. पेटंट देतांना कांहीं रकम तात्काळ रोख घेऊन कांहीं रकम विक्रीचे प्रमाणांत घेण्यांत पेटंट देणाराची रकम बुडण्याचा धोका बराच कमी होतो व पेटंट घेणारासहि सबंद्र रकमेची जबाबदारी एकदम घ्यावी लागत नाहीं. आंतरराष्ट्रीय येण्या-देण्यांत पेटंटबद्दल एकमेकांनी द्यावयाच्या रकमांचा भरणा बराच मोठा असूं शकतो. हिंदी कारखानदारांनी ब्रिटिश कंपन्यांशीं पेटंटबाबत करार केले, म्हणजे त्यांचे पोटीं ब्रिटिश कंपन्यांस ठरावाप्रमाणें दरसाल रकमा द्याव्या लागतील. म्हणजे, पेटंटच्या अकलेची अदृश्य निर्गत त्या करतील त्याचे पैसे हिंदुस्थानास मोजावे लागतील. हिंदी कारखाने किफायतशीर चालले तर पेटंटची रकम देणें त्यांस जड जाणार नाहीं परंतु त्याच्या खर्चाचा बोजा हिंदी कारखानदारांवर दीर्घकाळ किंवा कायमचा बसणें म्हणजे एकप्रकारें हिंदी गिऱ्हाइकावर म्हणजे जनतेवर कर बसण्यासारखेंच होणार आहे. हिंदी कारखानदार व ब्रिटिश कंपन्या ह्यांचेमधील करार हिंदी हितास बाधक होणार नाहींत, ह्याबाबत खबरदारी घेतली जाणें आवश्यक आहे. लिव्हरपूल येथील पेनिसिलीनचा कारखाना दोन महिन्यांनीं सुरू झाला म्हणजे इंग्लंडला अमेरिकन पेटंट वापरल्याबद्दल त्या देशास दरसाल हजारों डॉलर रॉयल्टी द्यावी लागणार आहे. पेनिसिलीनचा शोध जरी ब्रिटिश शास्त्रज्ञानें लावला असला, तरी मोठ्या प्रमाणावरील त्याच्या उत्पादनाची कल्पना अमेरिकनांची आहे. पदार्थांचें पेटंट घेतां येत नाहीं; त्याच्या उत्पादनपद्धतींचें घेतां येतें. त्याचा हा परिणाम आहे.

## खातेदाराचा बँकेविरुद्ध दावा

### 'गुड' शेरा मारलेला चेक

ज्याचे नांवानें चेक काढला असेल, त्याची बँकेंत चेक वटला जाण्याबद्दल खात्री करून देण्यासाठी चेक काढणारा खातेदार त्या चेकवर 'गुड' असा बँकेकडून शेरा मारून घेऊं शकतो. ह्या शेऱ्याचा अर्थ, "शेरा मारण्याच्या वेळीं खातेदाराच्या खात्यांत चेक पास होण्याइतकी रकम आहे" असा असल्याकारणानें, चेकचा कोणीहि तात्काळ स्वीकार करणें सुलभ होतें. ज्याचे नांवाने चेक काढला आहे, अशाला किंवा दुसऱ्या बँकेलाहि असा शेरा मारून मागतां येतो. खातेदाराच्या सूचनेप्रमाणें बँकेनें त्याच्या चेकवर "गुड" असा शेरा मारून दिला, म्हणजे बँक तो चेक स्वीकारण्यास आवश्यक असलेली रकम खातेदाराच्या खात्यांतून बाजूस काढून ठेवते. मागाहून काढलेले चेक स्वीकारल्यामुळें ही रकम अपुरी पडूं लागली, तर ते चेक नापास करतां येतात. खातेदारानें "गुड" असा शेरा चेकवर मारून घेतला, म्हणजे तो खातेदार मरण पावला, वेडा ठरला किंवा दिवाळखोर बनला तरी बँक चेकची रकम त्यांत नमूद केलेल्या मनुष्यास देते. 'गुड' शेऱ्याच्या चेकची रकम न देण्याबद्दल खातेदारानें बँकेस सूचना दिली, तरी कायदेशीर ठरत नाहीं.

ह्या संबंधांतील एक उद्बोधक वांधा अकबरअली इब्राहिमजी (वादी) व बेंगाल सेंट्रल बँक लि. (प्रतिवादी) ह्यांचेमध्यें निर्माण झाला आहे. जानेवारी, १९४६, मध्यें वादीने अमेरिकन सरकारकडून लिमलेटच्या गोळ्या खरेदी करण्याचा त्याचेशीं १२,९८,६१२ रुपयांचा करार केला व त्या किंमतीपैकी त्यानें प्रतिवादीस २,५९,७२२ रुपये आगाऊ अनामत दिले. उरलेल्या १०,३८,८९० रुपयांचा २१ फेब्रुवारी १९४६ चा प्रतिवादी बँकेवरील एक चेक वादीने अमेरिकन सरकारच्या प्रतिनिधीस दिला. त्या चेकवर वादीच्या विनंतिवरून प्रतिवादी बँकेने "गुड" असा शेरा मारला. प्रत्यक्ष माल पाहिला, तेव्हां तो मूळ वर्णनाप्रमाणें नाहीं असें वादीस आढळून आलें व त्याने बँकेस पत्र लिहून चेकचे पैसे देण्याचें स्थगित करण्याबद्दल सूचना केली. बँकेचा वादीने अमेरिकन सरकारशीं केलेल्या कराराशीं कांहीं संबंध नाहीं; वादीस चेकचा वटाव थांबविण्याचा अधिकार नाहीं, "गुड" असा शेरा मारल्यामुळें चेकचे पैसे देण्याची बँकेवर जबाबदारी आहे, असें बँकेने उत्तर दिलें. तेव्हां, बँकेने चेकची रकम देऊं नये ह्यासाठी तात्पुरतें इंजक्शन मागण्याचा वादीने मुंबई हायकोर्टांत अर्ज केला, तो कांहीं अटींवर उभय पक्षांच्या संमतीने मान्य करण्यांत आला आहे.

# स्फुट विचार

## अमेरिकेच्या परराष्ट्रीय धोरणाचा खुलासा

अमेरिकेचे अध्यक्ष प्रे. ट्रूमन यांनी शिकॅगो येथें भाषण करून अमेरिकेच्या परराष्ट्रीय धोरणाची दिशा सांगितली. मध्यपूर्वेतील व अतिपूर्वेकडील देशांची नैसर्गिक संपत्ति पडून आहे. तिचा उपयोग करून त्या देशांतून लोकशाही स्वातंत्र्याची जोपासना करण्याचा निश्चय त्यांनी बोलून दाखविला. प्रे. ट्रूमन यांच्या भाषणांत हिंदुस्थानचा नांवाने उल्लेख आलेला नसला तरी वसाहती व त्यांतील परकीय सरकारें यांच्यांत उत्पन्न झालेली तेढ विकोपास न जातां शांततेच्या मार्गानें नाहींशी करतां येईल अशी आशा त्यांनी प्रकट केली. वसाहतींतील दारिद्र्य नाहींसें केल्याशिवाय तेथें लोकशाहीचें रोपटें जीव धरणार नाहीं हें प्रे. ट्रूमन यांनी केलेलें विधान बरोबर आहे. पण हिंदुस्थानसारख्या वसाहतींतील दारिद्र्य नाहींसें करण्याचा खरा उपाय तद्देशीय औद्योगिक विकासाला मदत करणें हा आहे. या मुद्यासंबंधी प्रे. ट्रूमन कांहींच बोललेले नाहींत. उलट ब्रिटन-अमेरिकेंतील कर्ज-कराराचा उल्लेख करतांना त्यांनीं असें स्वच्छ सांगितलें आहे कीं, कॉंग्रेसने या कराराला मान्यता दिल्यावर जगांतील व्यापार अमेरिकन उद्योगधंद्यांना खुला होईल. या विचाराच्या दिशेवरून असें दिसतें कीं अमेरिकेच्या आजच्या लष्करी व आर्थिक सामर्थ्याचा फायदा घेऊन पूर्वेकडील सर्वच देशांतून अमेरिकेच्या व्यापाऱ्यांना बाजारपेठा मिळवून देण्याचा प्रे. ट्रूमन यांचा इरादा असावा. यंत्रविद्येबाबतहि अमेरिका पूर्वेकडील देशांना मदत करण्यास तयार आहे असें प्रे. ट्रूमन यांनीं जाहीर केलें असलें तरी त्यांचा मुख्य भर व्यापारावर दिसतो. जागतिक शांतता राखण्यासाठी अमेरिकेने लष्करी दृष्टीने समर्थ असलें पाहिजे हें त्यांचें म्हणणें मान्य केलें तरी १९४० पासून अमेरिकेने जगभर जे विमान, नाविक आणि लष्करी तळ निर्माण केले ते संयुक्त राष्ट्र-संघटनेच्या लष्करी संघटनेकडे देण्यास कांहीं हरकत नाहीं. अमेरिकेने १९४० सालापासून ४३४ तळ ठिकठिकाणीं उभारले आहेत. कर्नल कार्लसन या अमेरिकन लष्करी अधिकाऱ्यांनीं अशा प्रकारची सूचना पूर्वीच केलेली आहे. त्याचप्रमाणें हाऊस ऑफ रिप्रेझेन्टेटिव्हमधील एक सभासद मि. औटलंड यांनीं केवळ लष्करी बळावर अमेरिकेने हे तळ सर्वस्वी आपल्या ताब्यांत ठेवल्यास संशयास जागा दिल्यासारखें होईल असें बजाविलें आहे. प्रे. ट्रूमन हे या सूचनांबद्दल बोलत नाहींत, हें सुचिन्ह नव्हे.

---

## राष्ट्रसंघाची अखेरची बैठक

१९१४ ते १८ च्या महायुद्धानंतर जागतिक शांतता व सुरक्षितता कायम राखण्यासाठी त्यावेळचे अमेरिकन प्रे. विल्सन यांनीं राष्ट्रसंघाच्या स्थापनेचा मसुदा व्हर्सायच्या तहांतच घालण्याचा आग्रह धरला. आणि म्हणूनच केवळ लॉइड जॉर्ज व मॉ. क्लेमन्सो यांनीं त्या राष्ट्रसंघाच्या स्थापनेला मान्यता दिली. पुढें अमेरिकन कॉंग्रेसनें राष्ट्रसंघांत भाग घेण्याचें नाकारलें, सो. रशिया तर प्रथमपासूनच समाजवादी म्हणून वगळला गेला. त्याचा परिणाम असा झाला कीं, राष्ट्रसंघ इंग्लंड व फ्रान्स यांच्या हातांतील सत्ता संपादण्याचें व टिकविण्याचें एक साधन झालें. पुढें जर्मनींत हिटलरशाहीचा उदय झाल्यावर सो. रशिया राष्ट्रसंघांत सामील झाला. राष्ट्रसंघांतील रशियन प्रतिनिधि एम. लिटव्हिनॉफ यांनी सामुदायिक सुरक्षितता राखण्यासाठी शांतताप्रिय राष्ट्रांची आक्रमणं राष्ट्रांविरुद्ध एकजूट करण्याचे आटोकाट प्रयत्न केले, परंतु इंग्लंड-फ्रान्सच्या साम्राज्यवादी नेत्यांनी तोंडाने राष्ट्रसंघाला पाठिंबा देऊन कृतीने आक्रमण राष्ट्रांना म्हणजे जर्मनी, इटली, जपान यांना अप्रत्यक्ष उत्तेजन दिलें. त्यामुळें अखेर १९३९ सालीं दुसरें महायुद्ध होऊन त्यांतून आतां पहिल्या राष्ट्रसंघापेक्षां अधिक कार्यक्षम अशा संयुक्त राष्ट्र-संघटनेचा जन्म झाला. जुन्या राष्ट्रसंघांतील ४१ राष्ट्रांच्या प्रतिनिधींची बैठक जिनीव्हा येथें नुकतीच भरून राष्ट्रसंघाचें विसर्जन करण्यांत आलें. राष्ट्रसंघाची २ कोटि, ७५ लाख पौंडांची मालमत्ता नव्या संयुक्त राष्ट्र-संघटनेच्या ताब्यांत देण्याचें ठरलें. जागतिक राजकारणाला राष्ट्रसंघ शांततेच्या दृष्टीने इष्ट असें वळण लावूं शकला नाहीं. डॉ. कार्ले हँब्रो यांनीं ही गोष्ट लक्षांत ठेवूनच असेंब्लीच्या बैठकींत राजकारणाची चर्चा होणार नाहीं असें सांगितलें असावें. असेंब्लीने दोन कमिट्या नेमल्या असून त्यांपैकी आर्थिक आणि मामुली कारभार पहाणाऱ्या कमिटीचे अध्यक्ष म्हणून सर अतुल चतर्जी यांची नेमणूक केली आहे. दुसऱ्या कमिटीचे अध्यक्ष प्रोफेसर बोरकिंत (बेल्जम) हे असून तिजकडे सर्वसाधारण कारभार सोपविला आहे. राष्ट्रसंघ राजकीय दृष्टीने अपेशी ठरला असला तरी त्याच्यातर्फे जगांतील उद्योगधंदे, शेती, व्यापार, लोकसंख्येचे व मजुरांचे प्रश्न इत्यादींसंबंधी बरीच उपयुक्त माहिती गेल्या २६ वर्षांत गोळा केली गेली आहे. तिचा उपयोग नवीन संयुक्त राष्ट्र-संघटनेच्या अनेक उपयुक्त समित्यांना होण्यासारखा आहे.

---

## मजूर सरकारचें दुसरें अंदाजपत्रक

ब्रिटनमधील मजूर मंत्रिमंडळानें आपलें दुसरें अंदाजपत्रक डॉ. ह्यू डॉल्टन यांच्या हस्तें कॉमन्स सभागृहांत मांडलें. देशाच्या अर्थव्यवस्थेंत सरकारने हस्तक्षेप करणें म्हणजेच समाजवाद असा अर्थ केला तरच ब्रिटनचें हें अंदाजपत्रक समाजवादी अंदाजपत्रक म्हणतां येईल. तथापि पूर्णतया समाजवादी चौकटींत न बसलें तरी तें पुरोगामी आहे असें म्हणतां येईल. पैशाच्या सुकाळामुळें उत्पन्न होणाऱ्या परिस्थितीला खरा उतारा म्हणजे अधिक मालाची निपज होय; बाजारांत वस्तू नसतांना किंवा लवकर येण्यासारख्या नसतांना लोकांच्या जवळ फाजील पैसा ठेवणें म्हणजे एक आर्थिक सापळा आहे असें ते म्हणतात; आणि त्याचबरोबर ३१ डिसेंबर १९४६ नंतर जादा नफ्यावरील कर रद्द केल्याचें जाहीर करतात. त्यांच्या उक्तींचा व कृतींचा मेळ बसत नाहीं अशी टीका करण्यांत येत आहे. अंदाजपत्रकांतील इतर विशेष पुढीलप्रमाणें आहेत. (१) वारसा कराची फेरतपासणी (२) राष्ट्रीय-संरक्षण-निधि नव्या नांवाखाली तसाच चालू ठेवणें (३) करमणुकीवरील कराच्या दोन दरांपैकी कमी कर आकारणीची श्रेणी करमणुकींना लावणें (४) रोज गृहकृत्यांत लागणाऱ्या वस्तूंपैकीं बऱ्याच वस्तूंवरील विक्रीकर रद्द करणें (५) कमी उत्पन्न मिळविणाऱ्या सुमारें ५ लाख नागरिकांना प्राप्तीवरील करांतून मुक्त करणें आणि (६) काम करून मिळविलेल्या उत्पन्नावरील (Earned Income) कराची सूट एकंदर उत्पन्नाच्या एक दशांश होती ती यापुढें एक अष्टमांश परंतु १५० पौंडांपेक्षा अधिक नाहीं, अशी करणें.

---

### नवें बँकिंग बिल

हिंदुस्थान सरकारचे फडणवीस, सर आर्किबाल्ड रोलेंड्स, ह्यांनी बँकिंग कंपनीबाबत नवें बिल मध्यवर्ती असेंब्लींत नुकतेंच मांडलें. १९४४ सालीं तयार करण्यांत आलेल्या बिलावरील लोकमताचा विचार करून हें बिल आतां तयार केलेलें आहे. बँकिंग कंपनीनें सबसिडिअरी कंपनींत किती हितसंबंध ठेवावा, हें जुन्या बिलाच्या १५ व्या कलमांत सांगितलें होतें. आतां नव्या १६ व्या कलमानें तें बंधन अधिक कडक केलें आहे. कोणत्याहि कंपनीच्या विकल्या गेलेल्या भांडवलाच्या ४०% पेक्षां अधिक रकमेचे शेअर्स बँकेने स्वतःच्या अधिकारांत किंवा तारण म्हणून धारण करतां कामा नयेत, अशी मूळ अट होती; आतां हें प्रमाण २०% करण्यांत आलें आहे आणि त्याचा विकलें गेलेलें भांडवल व रिझर्व्ह ह्यांचेशीं संबंध जोडण्यांत आला आहे. ह्या प्रमाणाबाहेर बँकेचा असलेला हितसंबंध एका वर्षाचे अवधींत मर्यादेंत आणला पाहिजे. बँकेस शेड्यूल्ड बँकांच्या यादींत दाखल करणें किंवा तिचें नांव यादींतून काढून टाकणें, हा अधिकार सध्यां हिंदुस्थान सरकारकडे आहे; नव्या बिलानें तो रिझर्व्ह बँकेस दिला आहे आणि हें योग्यच आहे. विदेशी बँकांना लायसेन्स देण्याचे संबंधांतील तपशील १८ व्या कलमांत देण्यांत आलेला आहे. ब्रिटिश बँकांना त्याबाबत मिळणाऱ्या सवलतींवर मागील बिलाचे वेळींहि कडक टीका झाली होतीच. ग्रेट ब्रिटनमध्यें स्थापन झालेल्या बँकांवर बंधनें नाहींत आणि इंपीरिअल बँकेची कांहीं बाबींतील मक्तेदारी तशीच चालू राहणार आहे, अशी बिलावर करण्यांत येणारी टीका वस्तुस्थितीस धरूनच आहे.

---

### प्रॉव्हिडंट फंडाची गुंतवणूक

सध्याच्या कंपनी कायद्याप्रमाणें, कंपन्यांच्या नोकरांच्या प्रॉव्हिडंट फंडाची रक्कम ट्रस्टी रोख्यांत गुंतवावी लागते किंवा पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँकेंत ठेवावी लागते. पोस्टाच्या बँकेंत जास्तींत जास्त फक्त पांच हजार रुपयेच ठेवतां येतात. मोठ्या कंपन्यांच्या प्रॉव्हिडंट फंडाची उलाढालहि मोठी असते व त्यांना ही पांच हजारांची मर्यादा गैरसोयीची वाटते. ती गैरसोय टाळण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें एक बिल असेंब्लींत आणलें आहे. तें मंजूर झाल्यास, लिमिटेड कंपन्यांना शेड्यूल्ड बँकांत प्रॉव्हिडंट फंडाची कांहीं रक्कम ठेवण्याची सवलत मिळणार आहे.

---

### हिंदू स्त्रियांच्या कायदेशीर हक्कांत वाढ

हिंदू कायद्याची तपशीलवार छाननी करून तो सुधारण्याकरितां दुरुस्ती सुचविण्याचें काम राव कमिटी करीत आहे, परंतु तें काम पुरें होण्याची फार वाट न पहातां मध्यवर्ती असेंब्लीनें डॉ. देशमुख ह्यांचें बिल मंजूर करून हिंदू स्त्रियांच्या कायदेशीर हक्कांत वाढ केली आहे. नवरा क्रूर असेल, त्यानें पत्नीस टाकून दिलें, परधर्म स्वीकारला, दुसरा विवाह केला किंवा रखेली ठेवली, तर पत्नीस ह्या नव्या कायद्याप्रमाणें स्वतंत्र वास्तव्याचा व पोटगीचा हक्क प्राप्त होणार आहे.

---

**पुणें इलेक्ट्रिक सप्लाय कं. लि.**—वरील कंपनीचे एकूण ग्राहक १६,८०० आहेत त्यांनीं १९४५ सालीं २ कोटि, ७१ लक्ष युनिट्स वीज घेतली, त्याचे कंपनीस ३२ लक्ष, ९६ हजार रुपये मिळाले. लढाऊच्या फॅक्टरींतील व इतर युद्धजन्य कारखान्यांतील विजेचा खप कमी झाला तरी इतर ग्राहकांकडील खप वाढत आहे. १९४५ सालीं कंपनीस निवळ नफा ४ लक्ष, ५५ हजार रुपये झाला.

## दि बँक ऑफ औंध, लिमिटेड

### अध्यक्ष, ना. रा. बा. बिद्री, ह्यांचें भाषण

(दि बँक ऑफ औंध लि. च्या भागीदारांची आठवी साधारण सभा तारीख ३१ मार्च १९४६ इ. रोजीं दुपारीं ४ वाजतां औंध येथें श्रीयमाई देवीचे मंडपांत भरली होती. त्यावेळीं अध्यक्ष श्री. ना. रा. बा. बिद्री यांनीं केलेलें भाषण.)

१९३२ सालीं बँक लिमिटेड झाली, तेव्हांपासून गेल्या १३ वर्षांत बँकेकडे कधींही ठेवींची रक्कम गेल्या सालाइतकी वाढलेली नाहीं. यामुळें बँकेचें खेळतें भांडवल रुपये पंधरा लाखांचेवर गेलें आहे.

ठेवींतील वाढ जरी समाधानकारक असली तरी हा येणारा सर्वच पैसा कर्जांत गुंतत नसल्यानें त्याची फायदेशीर गुंतवणूक कशी करावी, हा मोठा प्रश्न आहे. एकूण साडेतेरा लाखांच्या ठेवींपैकी निम्म्याचे वर रक्कम तरती व वाटेल त्या क्षणीं उभी करतां येईल अशी आहे व ही स्थिति समाधानकारक आहे, हें आपणास मान्य होईल.

१९४४ सालीं संस्थानला धान्याचे व्यवहाराकरितां सुमारें साडेचार लाखांची रक्कम बँकेनें पुरविली होती. गेल्या सालीं संस्थाननें ही व्यवस्था अन्यत्र केल्यामुळें बँकेकडून संस्थाननें रक्कम मागितली नाहीं. बँकेकडे संस्थानची एक लाखाची ठेव आहे. यावर ६ टक्केप्रमाणें व्याज देणेचें बँकेनें १९५२ सालापर्यंत मान्य केलें आहे. वास्तविक इतक्या लांब मुदतीपर्यंत अशा भारी व्याजानें मोठी ठेव स्वीकारणेस नको होतें व त्याबाबत मोठीच चुकी झाली आहे. जगांतील कोठलेही व्याजाचे दर पाहतां हा व्याजाचा दर भारी आहे. बँकेनें संस्थानला गेले सालीं हा दर कमी करणेबद्दल विनंति केली होती, पण उपयोग झाला नाहीं. या प्रसंगानें संस्थानला मी पुनः एकदां विनंति करतों कीं, ही गोष्ट संस्थाननें पुनः विचारांत घ्यावी.

संस्थानांतील सहकारी खातें जास्त कार्यक्षम व्हावयास पाहिजे. सध्यां या खात्याकडे कोणाचेंच लक्ष नाहीं असें झालें आहे व त्याचा परिणाम बँकेच्या व्यवहारावर होत आहे. वसुलाचे कामांत कायद्यान दिलेल्या सवलती रेव्हिन्यू अधिकारी काढून घेतात, असें दृष्टोत्पत्तीस आलें आह. याचा परिणाम म्हणजे सोसायट्यांना देण्यांत येणारीं कर्जें बँकेला बंद करावीं लागतील असा संभव उत्पन्न झाला आहे.

बँकेनें संस्थानबरोबर जो करार केला आहे त्यामुळें हल्लीं बँकेला सुमारें रु. २५०० तोटा सोसावा लागत आहे. हा करार बदलणेबद्दल संस्थानकडे विनंति केली असून त्याचा निकाल अनुकूल लागल्यास बँकेचा नफा यापुढें रु. १५००० चे वर जाईल अशी माझी खात्री आहे. हा एक प्रश्न व ठेवीचे व्याजाचा प्रश्न हे दोन्ही संस्थान व बँक यांच्या दोघांचेही दृष्टीनें समाधानकारकपणें सोडविले गेल्यास बँकेची याहून भरभराट आपणास दिसेल व ती तशी दिसो अशी माझी श्रीजगदंबेसमोर प्रार्थना आहे.

---

**रबराचीं काटक झाडें**—अमेझॉन नदीच्या खोऱ्यांत रबराचीं झाडें आढळून आलीं आहेत, तीं रबर जास्त देतात व रोगांचा प्रतिबंध तीं अधिक चांगला करूं शकतात. त्यांतील निवडक झाडांचा नवी लागवड करण्याकरितां उपयोग करतां येण्याजोगा आहे.

## कै. शं. गो. देवधर

### ( एक सहकारी सैनिक )

गेल्या शुक्रवारीं ११ वाजतां हेड-ऑफिसमध्यें गेलों नाहीं, तोंच तेथील माझा एक मित्र खिन्नपणें मला म्हणाला, "काल आला असतास तर गांठ तरी पडली असती !" मी मनांत समजलों, नी दुःखहत झालों ! अखेर देवधरसाहेबांचें देहावसान झालें ! त्यांच्या कुटुंबीयांना तर ही घटना अति शोककारक आहेच पण मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँकेलाहि ती तितकीच दुःखद आहे. बँकेंत नोकरीला लागण्यापूर्वी ते शिक्षक होते. बँकेंत ते इन्स्पेक्टर, मग सुपरिंटेंडेंट ऑफ ब्रँचेस आणि शेवटीं १९३८ सालीं मॅनेजर झाले. शिस्त, चिकाटी, निष्ठा, निरलसता आणि परिश्रमसातत्य हे त्यांचे विशेष गुण होते. ते मॅनेजर झाल्यापासून बँकेची एकसारखी प्रगतिच होत गेली. जागतिक मंदीच्या मान्याने अगतिक झालेल्या बँकेची स्थिति, दुसऱ्या महायुद्धाच्या इतस्ततः पसरलेल्या ज्वालांनीं कल्पनातीत सुधारली. किंबहुना बँक सुस्थिर झाली आणि याचें पुष्कळसें श्रेय कै. देवधर यांचेकडे देण्यास कोणी कांकूं करील असें निदान मला तरी वाटत नाहीं. बँकेच्या वाढीकरितां ते अक्षरशः आमरणान्त खपले !

सीनिअर इन्स्पेक्टर या नात्याने त्यांचा नगर-बारामती भागांतील शाखांच्या नोकरवर्गाशीं फार घनिष्ठ संबंध आला. नोकरवर्गाशीं ते विशिष्ट मर्यादेपर्यंत मोकळेपणानें वागत आणि यामुळें त्यांच्याबद्दल स्टाफला एक प्रकारची आदरमिश्रित भीति वाटे. त्यांची काम करण्याची तऱ्हा अजब असे ! पुढ्यांत कागदांचें बंडल नी हाताशीं 'शुभ्रमुखीचें' बंडल असलें म्हणजे मग स्वारींची सविकल्प समाधि लागायची ! एकदां कामाला बसलं म्हणजे मग डोक्यांतील विचार नी टेबलावरील सिगारेट यांचा सांठा संपल्याशिवाय ते उठायचे नाहींत. कुणाशींहि बोलतांना ते 'हातचा राखून' बोलत नसत. जें कांहीं सांगायचें असेल तें स्पष्ट सरळ नी तोंडावर सांगून मोकळे होत. एकदां बँकेच्या एका जुन्या वरिष्ठ नोकराला त्यांनीं स्पष्ट सांगितलें कीं, "तुमच्यानें जर काम होत नाहीं, तर तुम्ही राजीनामा कां देत नाहीं ?" कांहीं कांहीं वेळेला ते एक घाव दोन तुकडे करून मोकळे होत. पण यामुळें कांहीं लोकांना त्यांचें लिहिणें Curt वाटे. सहकारी बँकेतील नोकर लोकांना जनतेशीं नेहमी आपुलकीनें पण आदब राखून वागणें जरूर असतें. या बाबतींतहि कै. देवधर साहेब यांचा कित्ता घेण्यासारखा आहे. सहकारी पुढाऱ्यांच्या मनांत त्यांच्याबद्दल नेहमीं आदर असे.

त्यांचें एक स्वभाववैशिष्ट्य म्हणजे त्यांचा बेछूटपणा होय ! त्यांच्या आयुष्यांत त्यांना माझ्या माहितीप्रमाणें तीन मोठे अपघात झाले. या तिन्हीं वेळच्या अपघातांचें स्वरूप गंभीर होतें. त्यांचें वर्णन 'वेळ आली होती पण काळ आला नव्हता' याच वाक्यानें करितां येईल. त्यांना ब्रिज खेळण्याचा विलक्षण नाद होता. शनिवारीं दुपारीं सुरू केलेला डाव कांहीं वेळेला ते सोमवारीं सकाळीं संपवीत. पुष्कळांना अचंबा वाटायचा कीं, इतका 'नादी' मनुष्य बँकेचें काम कसें काय उरकतो. पण 'मोठ्या' लोकांचीं हीच तर खुबी असते, त्यांच्यांत जसें वैशिष्ट्य असतें तसें वैचित्र्यहि असतें. ते अखंड धूम्रपान करीत पण चहाच्या थेंबालाहि स्पर्श करीत नसत !

हेडऑफिसला आल्यापासून सर्व कामें आस्ते आस्ते ते स्वतः होऊनच आपल्याकडे घेऊं लागले. श्री. वैकुंठरायें यांच्या हाताखालीं काम करण्याची त्यांना विशेष गोडी वाटे. ते पुष्कळदां म्हणत कीं, श्री. वैकुंठरायसारखें ड्राफ्टिंग कांहीं मला अजून जमत नाहीं. देवधरसाहेब मुंबईला आल्यापासून कामाच्या बाबतींत बोलायचें झालें तर असें म्हणतां येईल कीं, जुंबळ जरी श्री. वैकुंठराय यांच्या डोक्यावर होती तरी कामाच्या पाण्याचा घडा देवधरसाहेबच मुख्यतः वहात असत. त्यांच्या मृत्यूनें बँकेची फार हानि झाली आहे. त्यांची जागा भरून निघणें दुर्घट आहे. धोतराचा काचा कसातरी मारलेली, अंगांत खादीचा लाँग कोट घातलेली आणि तोंडांत सिगारेट असलेली देवधरसाहेबांची प्रेमळ, कधीं हंसरी तर कधीं ईषत्‌गंभीर मूर्ति यापुढें कधींच दृष्टीस पडणार नाहीं हें मनांत आलें म्हणजे अंतःकरणांत कालवाकालव सुरू होते... !

३०-३-४६

---

**हैद्राबाद स्टेट बँक**—वरील बँकेची चार वर्षांपूर्वी स्थापना झाली. आतां तिच्या १९ शाखा असून आणखी वाढ करण्याची योजना आहे. बँकेकडे ९३ कोटि रुपयांच्या ठेवी आहेत. गेल्या वर्षी तिला २ लक्ष ८७ हजार रुपये नफा झाला. गॅरंटीचें ३% डिव्हिडंड जाहीर करण्यांत आलें.




ठिकठिकाणीं एजंटस पाहिजेत.

आमच्या वाचकांसाठी

# सोपें केलेलें अर्थशास्त्र

२

लेखकः—श्री. व. वि. लोणकर, एम. ए., बी. कॉम.

**उपभोग्य वस्तूंची कमतरता**—जगांत मोफत अशी वस्तु फारच क्वचित मिळते. हवा, उजेड, पाणी हीं जरी बाह्यतः फुकट मिळतात असें दिसलें तरी हवा व उजेड भरपूर असलेल्या बंगल्याला भाडें जबर यावें लागतें. शहरांत पाणी मिळतें त्याच्याकरतां नळपट्टी भरावी लागते. आपल्या इकडे पाण्याच्या घागरी करतां एक आणा द्यावा लागणारीं गांवें पुष्कळच आहेत. अन्न आणि कपडालत्ता मिळण्याकरतां माणसाला निढळाच्या घामानें मिळणाऱ्या पैशानें गुजराण करावी लागते. सर्वसाधारण जनतेला पैसा मोजकाच भेटतो. आणि त्या पैशानें संख्येने मर्यादित अशाच वस्त घेतां येतात. जर आभाळांतून गारांप्रमाणें वस्तु पडूं लागल्या तर मात्र त्याला पैसा पडणार नाहीं. तरी पण त्या गोळा करण्याकरतां माणसाला श्रम करावे लागतीलच आणि पुष्कळ ऐदी माणसें पैसे देऊन ते वेचण्याकरतां मजूर लावतील. वर साबणाच्या वडीचें उदाहरण दिलें त्यांतच सिद्ध होतें कीं, इच्छित गोष्ट साध्य करण्याकरतां माणसाला प्रथम प्रचंड खटाटोप मांडावा लागतो. गरजा अनेक तशा वस्तु अनेक. त्या प्रमाणांत गणितश्रेढीनें खटाटोप मांडावा लागतो.

खटाटोप मांडूं म्हटलें, वे माणसानें श्रम करूं म्हटलें तरी दुर्दैवानें निसर्गानें साधनें मर्यादित केलेलीं आढळतील. लोखंडासारख्या धातु जरी निसर्गसिद्ध असल्या तरी त्या पृथ्वीच्या पोटांतून काढून शुद्ध केल्यावरच उपयोगी पडतात. कोळशाची तीच तऱ्हा. यांच्या खाणी जगांत मोजक्याच आहेत आणि त्यांतून निघणारी संपत्ति माणसांच्या गरजांच्या मानानें मोजकीच असते. अन्नोत्पादन करावयाचें तरी जमिनीची मुबलकताहि निसर्गानें ठेवलेली नाहीं. भूपृष्ठावर तीन चतुर्थांश पाणी व एक चतुर्थांशच जमीन आहे. अहे ती सर्वच जमीन लागवडीखालीं येण्यासारखी नाहीं व जी येण्यासारखी आहे ती तयार करण्यास श्रम आणि काळ लागतो. समुद्रांतून मासेमारीनें उपजीविका करावयाची तरी ती फक्त कांहीं लोकांनाच साधण्यासारखी आहे व मोठ्या प्रमाणांत ती करावयाची तरी उद्योग मोठाच करावा लागतो. जमीन एकसारखी कसत गेली तर तिचा कस कमी होत जातो असा अनुभव आहे. थोडक्यांत असें कीं, गरजा पुरविणाऱ्या वस्तु तयार मिळण्याकरतां लागणारीं साधनें अपुरीं आहेत.

दुसऱ्या एका दृष्टीनें विचार करतां एकच गरज पुरविणारी एकच वस्तु निर्माण करून भागण्यासारखें नाहीं. उद्यां नुसतें कापडच काढावयाचें ठरलें, तर जगाला पुरून उरूं शकेल इतकें कापड आहे त्या सर्व जमीन आदि साधनांचा उपयोग करून काढतां येईल, पण मग बाकीच्या गरजांची वाट काय? प्रत्येक जण भरपूर उंची कपडे करून बसूं शकेल, पण भूक स्वस्त बसूं देणार नाहीं. मग कापड कमी करून अन्न निर्माण करण्याकरतां कांहीं साधनसामुग्री वापरावी लागेल, त्याच तर्कानें सर्व प्रकारच्या वस्तू निर्माण करण्याकरतां जगांतील श्रम व साधनें निरनिराळ्या प्रमाणांत व प्रकारानें विभागावीं लागतील. याचा अर्थ असा कीं प्रत्येक वस्तु भरपूर प्रमाणांत उपलब्ध होऊं शकत नाहीं व प्रत्येकाला आपल्या इच्छेला व गरजेला कोठें ना कोठें बंध घालावा लागतो. प्रत्येकाला आपला पैसा जेणेंकरून आपल्या जास्तींत जास्त गरजा उत्तम तऱ्हेनें कशा भागवतां येतील याचा विचार करावा लागतो, व आपल्या खर्चाची आखणी आणि विभागणी करावी लागते. विशिष्ट गरजांना त्यामुळें आपोआप प्राधान्य येतें व त्यांची प्रतवारी लागते. या प्रतवारीला अर्थशास्त्रांत फारच महत्त्व प्राप्त होतें, कारण त्याचे परिणाम दूरगामी होतात.

**आर्थिक पसंतीची प्रतवारी**—गिऱ्हाईक गरज लागेल त्याप्रमाणें बाजार धुंडाळण्यास निघतें. त्याच्या प्रत्येक कृतीचा परिणाम कुठें आणि कसा होतो हें पाहणें फारच मनोरंजक आहे. पगार हातांत पडल्याबरोबर प्रथम वाणी, मग कापडवाला, त्यानंतर इतर संसारोपयोगी जिनसांचीं व शेवटीं चैनीचीं दुकानें असा सर्व साधारण गिऱ्हाइकाचा क्रम असतो. गिऱ्हाइकाच्या या पसंतीप्रमाणें दुकानदारांना माल ठेवणें प्राप्त आहे व त्याप्रमाणें त्या त्या वस्तु, जिनसा व पदार्थ उत्पादकांना अगोदर निर्माण करून ठेवणें भाग आहे. म्हणजे उत्पादकांना एकंदर गिऱ्हाइकाची मागणी किती व काय प्रकारची येऊं शकेल त्याचा विचार करून कमीजास्त प्रमाणांत व प्रकारांत आपापले उद्योगधंदे कमीजास्त वाढवणें अथवा चालू ठेवणें भाग पडेल. उद्यां कांहीं कारणानें गिऱ्हाइकाची मर्जी फिरली तर त्या प्रमाणांत उत्पादकांनाही आपल्या उत्पादनाचें स्वरूप बदलावें लागेल. कल्पना करा कोणी शोध लावला कीं साबण वापरणें घातुक आहे व तें जनतेंत पसरलें व त्याप्रमाणें गिऱ्हाइकांनीं साबण वापरणें सोडून दिलें तर काय होईल? सगळ्या साबणाच्या कारखान्यांना टाळीं लागून कारखानदार देशोधडीला लागतील? म्हणजे साबणांत गुंतवली जाणारी सामग्री वाया जाईल. कालांतरानें ती सामग्री दुसऱ्या कारणाकडे वापरली जाईल. आपल्या इकडे सध्या धोतरें कमी वापरण्याकडे कल दिसत असून लेंगा वापरण्याची प्रवृत्ति वाढत चाललेली दिसते. म्हणजे गिरणीवाल्यांना धोतर नेसण्यांत सभ्यता आहे व लेंगा पेहरण्यांत पोरकटपणा आहे असा प्रचार करण्याच्या भानगडींत न पडतां धोतराचें उत्पादन कमी करून लेंग्याचें कापड वाढविणें भाग आहे. देशांत विद्येचा प्रसार वाढला तर लोकांना वाचनाची व लेखनाची अभिरुचि लागून कागदाला पर्यायानें मागणी वाढेल. कांहीं चतुर मंडळी तत्परतेनें कागदाचें उत्पादन करण्यास लागतील. अशा प्रकारें जसजशी गिऱ्हाईकांची संख्या व पसंती वाढेल, कमी होईल अथवा फिरेल तसतशी उत्पादनाची दिशा फिरेल. व जगांतल्या साधनसामग्रीचें वांटप गिऱ्हाइकांना हव्या त्या प्रमाणांत आपोआप होईल. मग प्रश्न असा येतो कीं हें सर्व वांटप इतकें पद्धतशीर कसें घडून येतें, किती गिऱ्हाइकें काय माल मागतील हें उत्पादकाला कसें समजतें व सामग्री वाया अशी क्वचितच कशी जाते, जितकी गिऱ्हाइकाची मागणी तितकाच मालाचा पुरवठा हें समीकरण बसतें कसें? या प्रश्नाचा उलगडा 'बाजारभाव' या एका शब्दांत आहे व हा 'बाजारभाव' काय आहे, ठरतो कसा, ठरविणारे कोण हे प्रश्न सोडविण्यांतच अर्थशास्त्राचा पुष्कळसा भाग खर्च पडतो व त्याच्या सोडवणुकींतच अर्थशास्त्र सामावलें आहे असें म्हणतां येतें.

**विषयाची विभागणी**—वरील चर्चेवरून दिसून येईलच कीं माणसांना गरजा आहेत म्हणून उपभोग्य वस्तूंचें उत्पादन होतें व जगाच्या व्यवहारांस चालना मिळते. या व्यवहाराचें अभ्यासाच्या सोयीच्या दृष्टीनें चार विभाग पडतात. प्रथम उपभोगेच्छा, तिच्या शमनार्थ उत्पादन, हीं दोन्हीं एकत्र येण्याची क्रिया म्हणजे

विनिमय अथवा देवाण-घेवाण आणि हीं व्यवस्थित रीत्या घडवून आणणारे जे घटक त्यांचा मोबदला पर्यायानें जगांतल्या व्यवहार-मंथनांतून उत्पन्न होणाऱ्या संपत्तीची जेथल्या तेथें विभागणी अथवा विल्हेवाट.

**आर्थिक नियमांचें स्वरूप**—या प्रत्यहीं चालणाऱ्या व्यवहाराचे अभ्यासकांनीं कांहीं नियम बसविले आहेत. या नियमांनीं व्यवहाराचा कार्यकारणभाव दर्शित केला जातो. मात्र या नियमांना तर्कशास्त्रांतील नियमांचें निश्चित स्वरूप नसून ते आडाखेवजा आहेत. विज्ञानशास्त्रांत उष्णतेनें पदार्थ प्रसरण पावतो असा नियम आढळतो. तो सर्वस्वी लागू असून त्याला कोठेंच अपवाद सांपडत नाहीं. गणितांत दोन आणि दोन चार हे कायम असतात. इतकी सार्वस्विकता आर्थिक नियमांत असूं शकत नाहीं. उदाहरणार्थ, मागणीसंबंधींचा बहुतेकांच्या परिचयाचा, भाव खालीं आला तर मागणी वाढते हा नियम घेतला तर त्याला मध्यंतरीं गिऱ्हाइकांची कांहीं कारणानें मर्जी फिरली, तर भाव खालीं येऊनसुद्धां मालाला मागणी वाढणार नाहीं असा अपवाद सांपडेल. मनुष्य प्राणी स्वभावतः चंचल असतो. तो आज एका तऱ्हेनें तर उद्या दुसऱ्या तऱ्हेनें वागेल. यामुळें व्यवहाराच्या स्वरूपांत पदोपदीं फेरबदल होतात. अभ्यासकाला ही चंचलता लक्षांत घ्यावी लागते व एका वेळीं समोर ठेवलेल्या प्रश्नाचा विचार पूर्णतया करण्याकरतां अर्थबाह्य घडणाऱ्या गोष्टींना बाजूस ठेवून करावा लागतो. तसेंच इतर रसायनसारख्या शास्त्रांत शास्त्रज्ञांचा जड वस्तूंशीं संबंध येतो व त्यांचा प्रयोगशाळेंत मर्यादा घालून अथवा इच्छित अवस्था निर्माण करून अभ्यास करतां येतो. अर्थासारख्या सामाजिक शास्त्रांत प्रयोगांना अथवा प्रयोगशाळेला स्थान असूं शकत नाहीं. माणसाच्या रोजच्या बाह्य वागणुकीवरूनच नियम बांधावे लागतात. व म्हणून आर्थिक नियमांचें स्वरूप सर्वसाधारण असें राहतें.

( ह्या विषयाचा पहिला लेखांक ता. २८ नोव्हेंबरच्या अंकांत प्रसिद्ध झाला आहे.

---

## श्री. ग. वि. साळवेकर ह्यांचें महाराष्ट्रीय उद्योगधंद्यांस सक्रिय सहाय


### ४३ कंपन्यांचे शेअर होल्डर

" मराठी शेअर ब्रोकर्स " नीं ज्यास्तींत ज्यास्त मराठी कंपन्यांचे भाग घेणाऱ्या भागीदारांचा सन्मान करण्याचें योजून त्याप्रमाणें माहिती मागविली होती. त्यावरून, श्री. ग. वि. साळवेकर, बी. ए., मालक, सरदारगृह, ह्यांचेजवळ सर्वांत अधिक म्हणजे ४३ मराठी कंपन्यांचे भाग आहेत असें दिसून आल्यावरून त्यांचा जाहीर सन्मान रविवार, ता. १४ रोजीं व्यापारी महाराष्ट्र सभागृहांत करण्यांत आला. श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित हे अध्यक्षस्थानीं होते. श्री. घागे, श्री. साळवेकर, श्री. क्षीरसागर, श्री. जोशी, श्री. केळकर, इत्यादींच्या भाषणानंतर श्री. जगन्नाथ महाराज ह्यांनीं समयोचित भाषण करून श्री. बाबासाहेब साळवेकर ह्यांस मानचिन्ह अर्पण केलें. श्री. बाबासाहेबांनीं आभारप्रदर्शक भाषण केल्यावर समारंभ संपला. भाग धारण करणारांत श्री. साळवेकर ह्यांचेनंतर श्री. पु. ग. मराठे ह्यांचा अनुक्रम लागतो, असें समजतें.

---

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

ओलक ] फाफ मशिनच्या तोडीचीं [ ओलक
ओलक शिवण्याचीं यंत्रें
रोखीनें अगर हप्त्यानें मिळतात.
लिहा अगर भेटा:—व्ही. आर. बापट,
ओलक मशिन कं., लकडी पुलाजवळ,
लक्ष्मीरोड, पुणें नं. २

पेडणेकर आणि कंपनी लि.,

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २७७३८

पैसा आणि ज्ञान वाढवा !
श्रीमंत कसें व्हावें ?—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक ! हें भाग्यवर्धक पुस्तक हजारों रु. मिळवून देईल ! किं. १॥ रु., यशाचा सूर्योदय—व्यापार उद्योगधंद्यांत नक्की यश कसें मिळवावें तें शिकवितें. किं. १॥ रु., काम आणि कामिनी—नैसर्गिक काम सौख्याचें सुंदर विवेचन करतें. किं. १॥ रु., मृत्युलोकचा प्रवास—अद्भुत कथानक ! किं. १ रु.
—आजच लिहा—
मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.

—शुद्ध कथिलानें कल्हई लावणारे—
केळकर कल्हईवाले
कल्हईचें काम प्रत्येकाचे घरीं जाऊन केलें जाईल
आजचा भाव
दररोजचीं भांडीं शेंकडा १० रुपये
नवीन भांड्याचा भाव भांडीं पाहून
पत्ताः—C/o डॉ. डी. जी. पटवर्धन
ना. गोखले चौक, पुणें ४

## फेडरेशनचें १९ वें वार्षिक अधिवेशन

### महाराष्ट्रीय प्रतिनिधींचीं भाषणें

दिल्ली येथील फेडरेशनच्या अधिवेशनास उपस्थित असलेल्या महाराष्ट्रीय प्रतिनिधींपैकीं श्री. न. गं. आपटे, श्री. द्वा. वा. पोतदार, श्री. ल. म. डहाणूकर व श्री. आ. रा. भट ह्यांचीं भाषणें झालीं.

**श्री. न. गं. आपटे : अन्नपरिस्थिति**

श्री. न. गं. आपटे हे अन्नपरिस्थितीवरील ठरावावर बोलले. ते म्हणाले:—" हिंदुस्थानांत पावसाची अनिश्चितता व तज्जन्य उत्पादनाचा अपुरेपणा फार दिवसांपासून आहे. मुळांतील ही कमतरताच दूर व्हावी व त्यासाठीं विहिरी, तलाव व कालवे खणून पाणीपुरवठा व्हावा व प्रत्येक विभागाला स्वावलंबी होतां यावें अशा दृष्टीनें त्या त्या विभागांतील पिकें वाढावींत हा एक व हंगामाच्या दिवसांत वाया जाणारे आणि विशिष्ट विभागांत मुबलक पिकणारे अन्नपदार्थ आधुनिक शास्त्रीय उपायांनीं जतन करण्याचें कार्य मोठ्या प्रमाणावर सुरू करावें हा दुसरा असे दोन उपाय सुचवितां येण्याजोगे आहेत. "

**श्री. डहाणूकर : संरक्षक जकाती**

मुंबईच्या महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष श्री. डहाणूकर हे संरक्षक जकातींच्या ठरावावर बोलले. ते म्हणाले:— " सरकारनें युद्धकालांत प्रस्थापित व प्रगत झालेल्या कारखानदारीला संरक्षण देण्यासंबंधीं विचार करण्याकरितां टारीफ बोर्ड स्थापन केल्याबद्दल फेडरेशननें समाधान व्यक्त केलें आहे. परंतु सध्यांच्या अनिश्चित परिस्थितींत या मंडळाला हिंदी कारखानदारीच्या हिताच्या नक्की योजना आंखणें कठीण असल्यामुळें हिंदी व्यापारी व कारखानदार मंडळींच्या विचारानें हिंदी उद्योगधंद्यांची एक कच्ची यादी तयार करावी व त्या धंद्यांना ताबडतोब संरक्षण देण्यांत यावें. त्याचप्रमाणें सरकारनें जरा दीर्घकालीन असें एतद्विषयक आपलें धोरण निश्चित करावें व कायमचें टारिफ बोर्ड नेमून त्याकडून त्वरित निरनिराळ्या धंद्यांसंबंधींच्या परिस्थितीची चौकशी व्हावी. कालापव्यय होणाऱ्या पद्धति सोडून देऊन जलद काम उरकेल व हिंदी कारखानदारीस दीर्घकालीन व भरपूर असें संरक्षण योजनापूर्वक मिळेल अशा धोरणानें सदर टॅरिफ बोर्डाचें काम चालावें. "

**श्री. आ. रा. भट : निर्यात व्यापार**

श्री. आ. रा. भट यांनीं निर्यात व्यापाराच्या ठरावाचा पुरस्कार केला. ते म्हणाले:-" जर्मनी व जपान या दोन मोठ्या औद्योगिक देशांचा पराभव होऊन त्यांची कारखानदारी पार धुळीस मिळालेली आहे. या परिस्थितींत हिंदुस्थानाच्या शेजाराला असलेल्या द. आफ्रिका, इराक, ईजिप्त, सिलोन, ब्रह्मदेश, मलाया वगैरे देशांतील बाजारपेठांमध्यें हिंदी मालाला भरपूर वाव मिळणें अगत्याचें व न्याय्य आहे. असें असतांना हिंदी माल या देशांत जाऊं नये अशा धोरणानें निर्यात व्यापार सल्लागार मंडळाचें काम चाललेलें दिसतें. भारत गिरण्यांच्या हिंदी यंत्रसामुग्रीस परदेशांतून भरपूर मागणी असूनहि ही यंत्रसामुग्री तयार करण्यासाठीं भरपूर कच्चा माल दिला जात नाहीं. तयार यंत्रसामुग्री रवाना करण्यास वाहतुक मिळत नाहीं. हिंदुस्थान सरकारच्या निरनिराळ्या खात्यांत एकवाक्यता नाहीं. त्यामुळें निर्यातीचे परवाने मिळण्यास अनेक अडचणी येत आहेत. ही सारी परिस्थिति बदलली पाहिजे. हिंदी निर्यात व्यापारास भरपूर उत्तेजन मिळालें पाहिजे."

**श्री. द्वा. वा. पोतदार**

फेडरेशनच्या अंतर्गत व्यवस्थेबाबत ठरावावर श्री. पोतदार यांचें भाषण झालें.


# दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लिमिटेड.

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें.

मुंबई शाखा : इस्माईल बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | ,, १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | ,, ४,६२,३०० |
| एकूण खेळतें भांडवल | ,, ५०,००,००० |

मद्रास, सोलापूर, नगर व मुंबईवर ड्राफ्टस् दिले जातात.

शेअर सर्टिफिकेटस् तयार आहेत. तरी शेअरबाबतच्या पावत्या पाठवून दिल्याबरोबर सर्टिफिकेटस् पाठविण्याची व्यवस्था होईल.

गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर — चिं. त्रिंबक चितळे, मॅ. डायरेक्टर

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें.

| अधिकृत भाण्डवल | विक्रीस काढलेलें व खपलेलें |
|---|---|
| रु. ५०,००,००० | रु. २५,००,००० |

वसूल झालेलें भांडवल रु. १२,५०,०००

रिझर्व्ह व इतर फंड रु. ३,००,०००

एकूण खेळतें भाण्डवल रु. १,५०,००,००० चे वर

★ बँकेच्या शेअर्सवरील डिव्हिडंडमध्यें क्रमशः वाढ होत आहे.

★ गतवर्षी शें. ५ टक्के डिव्हिडंड देण्यांत आलें.

—:शाखा:—

डेक्कन जिमखाना, (पुणें), खडकी, गिरगांव, मुंबई, जळगांव, नागपूर, रत्नागिरी, कोपरगांव व फैजपूर ( पे-ऑफिस )

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग, मॅनेजर

# मुंबई शेअर बाजार

वर्ग पुस्तकें बंद

नागपूर ५–४–४६ } २०–४–४६ }
स्वदेशी मिल्स १२–४–४६ } ४–५–४६ }

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

व्याज–वजा

नागपूर रु. ५ दि. २९–४–४६
स्वदेशी रु. २२ दि. १५–५–४६


| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार ९।४।४६ | बुधवार १०।४।४६ | गुरुवार ११।४।४६ | शुक्रवार १२।४।४६ | सोमवार १५।४।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९–८–९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | २८७१—४ | —रामनवमी निमित्त बाजार बंद— | २८८२—८ | २८९२—८ | २८६२—८ |
| ४८०; ३७२ | २३–०–० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ५१२—० | | ५१५—० | ५१६—० | ५१०—८ |
| २२२२–८; १७६३–१२ | ५०–०–०S | मार्च–सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २३३३–१२ | | २३५०—० | २३४५—० | २३४५—० |
| ७०२; ५६६ | १९——०† | मार्च–सप्टें. | कोहिनूर | १०० | ८१७—० | | ८२२—० | ८२१—८ | ८१५—० |
| ६६८; ५०७ | २२–०–० | मे | स्वदेशी | १०० | ७५६—० | | ७६९—० | ७७४—० | ७६३—० |
| ४४३–८; ३६० | ५–०–०† | नोव्हें.–एप्रिल | नागपुर | १०० | ४५९—० | | ४६२—० | ४६३—० | ४६०—० |
| ३४२–०; २७५ | १५–०–० | मार्च | फिनले | १०० | ३७९—० | | ३८२—० | ३८७—० | ३८५—८ |
| ३३५; २८३–८ | ८–०–०S | ऑक्टो.–एप्रिल | गोकाक | १०० | ३४८—० | | ३५१—० | ३५२—८ | ३५२—० |
| ३३७; २४३ | ४–०–०† | जाने.–जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३७६—८ | | ३८२—८ | ३८१—८ | ३८०—० |
| ५; ३-११-० | ०–४–० | मार्च | अपोलो | २ | ५—२ | | ५–२–६ | ५—४ | ५—५ |
| १७-१०; १३-७-० | ०–१५–० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | २०—५ | | २१—० | २१—० | २१–३–६ |
| ३-१०; २-९ | ०–३–० | मे | ,, डिफर्डस् | १ | ३–१४–३ | | ३–१५–६ | ३–१५–६ | ४–०–६ |
| ७९०; ६४५ | ३५–०–० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ७८७—८ | | ७९६—४ | ७९५—० | ७९७—८ |
| २४३–८; २०६-८ | ७–०–० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २५०—० | | २५३—८ | २५३—० | २५१—० |
| २५६; २१३-८ | ८–०–० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २८०—० | | २९०—० | २९०—८ | २९०—० |
| ५९२–८; ५१०–० | ७–८–० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ६२१—४ | | ६२०—० | ६२०—० | ६२२—८ |
| ४३-७; ३०-१२ | १–४–० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ३८—३ | | ३८—८ | ३८—६ | ३८—८ |
| | | | ३½% रोखे | १०० | १०३—३ | | १०३ | १०२–१४ | १०२–१४ |

सोमवार दि. ८–४–४६ चे भाव

| ३% गव्हर्मेंट लोन्स | | बँका | | वीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९४६ | १०१—९ | बरोडा | १८२—८ | आंध्रा व्हॅली | १८७०–० | अलकॉक | ४७८–० |
| १९५१–५४ | १०२—२ | सेंट्रल | १२२—८ | बॉम्बे ट्रॅम | १५८–८ | बॉंबे स्टीम | ६५५–० |
| १९५७ | १०२—८ | इंडिया | २३७—० | टाटा हायड्रो | २१७–८ | न्यू इंडिया | ११६–८ |
| १९५९–६१ | १०२—८ | इंपी० | २४९०—० | टाटा पॉवर | १९७०–० | शिवराजपुर | ५६–८ |
| १९६३–६५ | १०२–१० | | ६४०—८ | | | टाटा केमिकल | २७–४ |
| १९६६–६८ | १०२—८ | रिझर्व्ह | १६१—० | | | टाटा ऑईल | ११९–० |
| १९७०–७५ | १०२–१३ | युनियन | १४–१४ | | | | |

शुक्रवार दि. १९–४–४६ ला गुड फ्रायडेनिमित्त बाजार बंद आहे.

या आठवड्यांत ' साप्ताहिक वळण ' होणार नाहीं.







## विविध माहिती

**निवृत्त सैनिकांस कर्जे**—अमेरिकन सरकारनें युद्धांतून परतलेल्या १,०२,००० सैनिकांस आतांपर्यंत सुमारें १६० कोटि रूपयांचीं कर्जें दिलीं आहेत. त्यापैकी ९३, ६६० कर्जें घरें बांधण्यासाठीं आहेत.

**इटलीची अमेरिकेंत खरेदी**— इटलीला अमेरिकेकडून कपास खरेदी करतां यावी, ह्यासाठी त्या देशास अमेरिकेनें सुमारें ९ कोटि रुपये कर्जाऊ दिले आहेत. त्यांतून इटली २ लक्ष : गाठी कपास घेऊं शकेल.

**संयुक्त राष्ट्रसंघटनेची वर्गणी**—संयुक्त राष्ट्रसंघटनेची सभासदत्वाची संपूर्ण वर्गणी रशियानें दिली आहे. बेल्जम, नॉर्वे आणि नेदरलंडस ह्या देशांचेंहि कांहीं देणें राहिलेलें नाहीं. अमेरिका, इंग्लंड व फ्रान्स ह्या देशांनीं अद्याप आपली सबंध वर्गणी दिलेली नाहीं.

**नवीन स्टॉक एक्सचेंज**—दिल्ली येथें एक नवीन स्टॉक एक्सचेंज स्थापन झाला आहे.

**प्रमुख बंदरें**— हिंदुस्थानाच्या किनाऱ्याची लांबी सुमारें ४,००० मैल आहे. परंतु त्यावरील बंदरें पहातां सातच मोठीं बंदरें आढळतात. कराची, मुंबई, कोचीन, मद्रास, विजगापट्टम, कलकत्ता व चितगांव हीं तीं होत. त्याखेरीज आणखीहि पुष्कळ बंदरें असलीं तरी त्यांत मोठाल्या आगबोटी उतरूं शकत नाहींत. वरील सात प्रमुख बंदरांपैकी फक्त तीनच पश्चिम किनाऱ्यावर आहेत.

**हिंदुस्थान व अमेरिका ह्यांचेमधील वाटाघाटीः**—हिंदुस्थान व अमेरिका ह्यांचेमधील खंड–उसनवार, शिलकी माल, परस्पर सहाय्य, इत्यादींचे संबंधांतील प्रश्नांचा अखेरचा निकाल लावण्यासाठीं त्यांच्या प्रतिनिधींची बैठक वॉशिंग्टन येथें लवकरच भरणार आहे. युद्धकाळांत अमेरिकेनें हिंदुस्थानकडे बरेंचसें युद्ध-साहित्य पाठविलें. हिंदुस्थाननें येथील अमेरिकन फौजांस कितीतरी माल पुरवला व अमेरिकेकडेहि पुष्कळ माल धाडला. आतां बहुतेक अमेरिकन फौजा हिंदुस्थानांतून निघून गेल्या असल्याकारणानें, मागें राहिलेल्या अमेरिकन मालाचा उठाव लवकर करून टाकावयाचा आहे. हा सर्व माल हिंदुस्थान सरकारास विकून टाकण्याचें ठरलें आहे. त्याच्या तपशिलाचा विचारहि वरील बैठकींत होईल.

**साखरेचें रेशन कमी होणार**—गत वर्षी मुंबई प्रांताच्या वांटणीस १½ लाख टन साखर आली होती. यंदा मुंबई प्रांताच्या वांटणीस १¼ लाख टनच साखर आली आहे. तेव्हां यापुढें मुंबई, पुणें, अहमदाबाद, सोलापूर इत्यादि शहरांच्या साखरेच्या रेशनमध्यें २५ टक्के कपात होईल. खेडेगांवचें साखर रेशन हल्लींप्रमाणें चालू राहील.

**मुंबई इलाख्यांतील शाळांसाठी जीवनसत्त्वाच्या गोळ्या**—येऊं घातलेल्या दुष्काळाला तोंड देण्यासाठी जीवनसत्त्वाच्या १० कोटि गोळ्या हिंदी सरकारनें अमेरिकेंतून मागविल्या आहेत. या मुख्यत्वें शाळांतून वांटण्यांत येतील. त्यांचेंप्रमाणें न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया व अमेरिका ह्यांतून १० हजार टन दुधाची भुकटी मागविण्यांत आली आहे. दुर्भिक्षामुळें पसरणाऱ्या सांथींना तोंड देण्यासाठी व कॉलरा, देवी वगैरे रोगांच्यी उपशमनार्थ लस तयार ठेवण्यांत आली असून विहिरींतील पाणी खराब न होण्यासाठी त्यांत घालण्यासाठी ब्लिचिंग पावडरचाहि सांठा ठेविला आहे.




सन १९४५ मधील प्रगति
नवें काम ७,००,००० रु.
चालू काम २०,००,००० रु.
१९४५ मधील हप्त्यांचें उत्पन्न सुमारें १,००,००० रु.
खर्चाचें प्रमाण फक्त ११%
— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —
दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.
आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर




महाराष्ट्र एजन्सी.
मेसर्स जयप्रकाश आणि कं.
२५५।४, सदाशिव, पुणें.



## —: साठे बिस्किटें :—

श्रूसबरी, ऑरेंज, फ्रॅन्सिस व फॅमिली मुंबई प्रांतांतील ग्राहकांस पूर्ववत् मिळूं लागलीं. परिस्थिति अनुकूल होतांच इतर प्रांतांतील ग्राहकांसही पाठवूं शकूं.

—साठे बिस्किट कं., पुणें २

---

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादींचा सुंदर संच

## खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

---

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-treaders and Approved Contractors )

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्ष : श्री. माधव रामचंद्र जोशी, बी. ए. कागदाचे व्यापारी.

### महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स

★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे

मॅनेजिंग डायरेक्टर.








हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गानिवास, ८२३, शिवाजी नगर, ( पो ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.